आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शनिवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या अमेरिकादौऱ्यावर रवाना.
2. २०२३-२४ या आर्थिक वर्षात देशभरात १९ हजार कोटी डिजिटल व्यवहार.
3. पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या ५ ऑक्टोबरला वाशिमच्या पोहरादेवीत; 'बंजारा विरासत' नंगारा वास्तुसंग्रहालयाचे करणार लोकार्पण.
4. वंचित बहुजन आघाडीची विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांची पहिली यादी जाहीर, नागपूरच्या दक्षिण पश्चिम मतदारसंघातून विनय भांगे यांना उमेदवारी.

****

अमेरिका दौरा

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यासाठी आज सकाळी रवाना झाले. या दौऱ्यात ते उच्चस्तरीय बैठकीत सहभागी होतील. प्रधानमंत्री आज डेलावेअरमधल्या विल्मिंग्टन इथं होणाऱ्या क्वाड परिषदेत सहभागी होऊन या दौऱ्याच सुरुवात करतील. हवामान बदल ते उदयोन्मुख तंत्रज्ञान असे अनेक विषय या परिषदेत चर्चिले जाणार आहेत. क्वाड गटातल्या इतर नेत्यांसह प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. आपण अमिरेकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन, ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बेनीज, जपानचे प्रधानमंत्री फुमिओ किशिदा यांच्यासोबत क्वाड परिषदेत सहभागी होण्यासाठी उत्सुक आहोत, असं प्रधानमंत्र्यांनी अमेरिकेला रवाना होण्याआधीच्या निवेदनात म्हटलं आहे. क्वाड गट हा प्रशांत महासागर प्रदेशात शांतता, प्रगती आणि समृद्धी स्थापित करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या देशांचा समूह असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. आपण भारतीय वंशाच्या नागरिकांना आणि व्यावसायिकांना भेटायला उत्सुक असल्याचंही प्रधामंत्र्यांनी म्हटलं आहे. दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी प्रधानमंत्री संयुक्त राष्ट्रांच्या महासभेला संबोधित करतील.

****

शंभर दिवस

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने तिसऱ्यांदा निवडून आल्यानंतर पहिल्या शंभर दिवसांत लोककल्याणकारी योजनांसाठी १५ लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारण आणि संसदीय कामकाज राज्यमंत्री डॉ.एल. मुरुगन यांनी सांगितलं. तामिळनाडू मधल्या थुथुकुडी इथं आज ते बोलत होते. पायाभूत सुविधांसाठी तीन लाख कोटी तसंच रेल्वेच्या विकासासाठी ६३ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

****

पीएम विश्वकर्मा प्रदर्शन

प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त वर्धेच्या स्वावलंबी मैदानावर उभारण्यात आलेल्या थीम पॅव्हेलियनमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या **18** कलाकृतींच्या प्रदर्शनाची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल पाहणी केली. तसेच यावेळी त्यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधून माहिती जाणून घेतली. हे प्रदर्शन नागरिकांसाठी **21** व **22** सप्टेंबर रोजीसकाळी **11** ते सायंकाळी पाच पर्यंत खुले राहणार आहे. प्रदर्शनीमध्ये या उत्तराखंड राज्यातील जैंबुन निशा (गारलँड मेकर), बिहार येथील सिंटू कुमार (डॉल व टॉय मेकर), नागालँड येथील अखिरिली किरहा (सुतार), मध्यप्रदेश येथील रामनाथसिंग गुजर (मुर्तीकार), केरळ राज्यातून सतीष के.सी. (सोनार), ओडीशा येथील सुदिप्ता दास (मत्सजाळे कारागीर), तसेच इतर राज्यातील कारागिरांनीत यार केलेल्या कलाकृतींचा समावेश आहे. पी.एम. विश्वकर्मा योजने संदर्भात आयोजित प्रदर्शनी चा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन वर्ध्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

****

डिजिटल व्यवहार

२०२३-२४ या आर्थिक वर्षात देशभरात डिजिटल पद्धतीने झालेल्या व्यवहारांमध्ये वाढ झाली असून १९ हजार कोटी डिजिटल व्यवहार झाले आहेत. २०१७-१८ या आर्थिक वर्षात २ हजार कोटींहून अधिक डिजिटल व्यवहार झाले होते. या कालावधी दरम्यान युपीआय अर्थात यूनिफाइड पेमेंट्स इंटरफेस च्या माध्यमातून झालेल्या व्यवहारांमध्ये देखील ९० कोटींनी वाढ झाली असून १३ हजार कोटींहून अधिक युपीआय व्यवहार या काळात झाले आहेत. तर २०२३-२४ या आर्थिक वर्षात

युपीआयच्या माध्यमातून २०० लाख कोटी रुपयांची देवाणघेवाण देशभरात झाली आहे. सध्या संयुक्त अरब अमिरात, सिंगापूर, भूतान, नेपाळ, श्रीलंका, फ्रान्स, आणि मॉरीशस या ७ देशांमध्ये युपीआय व्यवहार सुरु आहेत.

****

आठवले पुरस्कार

मारवाडी फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार यंदा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांना जाहीर करण्यात आला आहे. उद्या **22** सप्टेंबर रविवार रोजी सकाळी साडेअकरा वाजता नागपूरच्या सिविल लाईन्स स्थित चिटणवीस सेंटर येथील बनयान सभागृहामध्ये हॉलमध्ये होणाऱ्या या सत्कार समारंभ प्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मारवाडी फाउंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी उपस्थित राहणार आहेत या पुरस्काराचे स्वरूप पाच लाख रुपये, शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह असे आहे. मारवाडी फाउंडेशनतर्फे दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार जनमानसात रुजविणाऱ्या एका मान्यवराला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्काराने सन्मानित केले जाते. केंद्रीय राज्यमंत्री आठवले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना अनुसरून देशभरात वंचितांना न्याय देण्याचे मोठे कार्य केले आहे. बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होऊन ते देशभरात उपेक्षितांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य करीत आहेत, असे गिरीश गांधी यांनी म्हटले आहे.

****

काँग्रेस शिष्टमंडळ

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वात पक्षाच्या शिष्टमंडळाने राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची मुंबईचा राजभवन येथे भेट घेऊन सत्ताधारी नेत्यांच्या बेताल वक्तव्याची तक्रार केली. काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी यांना भाजप नेत्यांकडून वारंवार धमकी दिली जात आहे. धमकी देणाऱ्यांना अटक करून संबंधित नेत्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

शेतकरी आत्महत्या, दुष्काळ, राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून यावेळी सरकार कडून हिंदू- मुस्लिम समाजामध्ये तेढ निर्माण करून भांडण लावण्याचे काम सुरु असल्याची तक्रार ही करण्यात आली. या शिष्टमंडळात विरोधी

पक्ष नेते विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात आणि माजी मंत्री डॉ.नितीन राऊत यांच्यासह पक्षाचे जेष्ठ नेते उपस्थित होते.

****

स्वच्छता ही सेवा

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत 'स्वच्छता ही सेवा, हे अभियान यवतमाळ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामस्थाने या मोहिमेत सहभागी होऊन आपआपले गाव स्वच्छ करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी केले. वर्धा इथल्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात स्वच्छता हि सेवा अंतर्गत स्वच्छता जागरूकता रॅली काढण्यात आली. या शिवाय विद्यापीठात विविध कार्यक्रम घेण्यात येत आहे.

****

पंतप्रधान-पोहरादेवी दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी २६ सप्टेंबर रोजी वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी येथे ‘बंजारा विरासत’ या नंगारा वास्तुसंग्रहालयाचे लोकार्पण करण्यासाठी येणार होते. मात्र पोहरादेवी येथील प्रसिद्ध जगदंबा मंदिर व संत सेवालाल महाराज समाधीस्थळाचे भाविकांमध्ये विशेष महत्व असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येथे नवरात्रोत्सवात येण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यामुळे २६ सप्टेंबरचा त्यांचा येथील दौरा पुढे ढकलण्यात आला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आता शनिवार, ५ ऑक्टोबर रोजी पोहरादेवी येथे येणार आहेत, अशी माहिती यवतमाळ-वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी दिली. पालकमंत्री संजय राठोड यांनी पंतप्रधान यांच्या पोहरादेवी दौऱ्याच्या अनुषंगाने कार्यक्रमस्थळाची पाहणी करून नंगारा म्युझियम येथील कामांचा आढावा घेतला. पोहरादेवी येथे प्रसिद्ध जगदंबा माता मंदिर असल्याचे कळाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवरात्रोत्सवात हा कार्यक्रम घेण्याची सूचना केली. ५ ऑक्टोबरला सकाळी १० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रीद्वय देवेंद्र फडणवीस, अजित पवार आदी मान्यवर पोहरादेवी येथे पोहोचणार आहेत. त्यानंतर येथील जगदंबा मंदिर, संत सेवालाल महाराज, धर्मगुरू रामरामबापू महाराज यांच्या समधीचे दर्शन घेवून ‘बंजारा विरासत’ या नंगारा वास्तुसंग्रहालयाचे लोकार्पण करतील. त्यानंतर ते येथे आयोजित सभेस संबोधित करतील, अशी माहिती राठोड यांनी दिली. ‘बंजारा विरासत’ नंगारा वास्तुसंग्रहालय आंतरराष्ट्रीय दर्जाचे बनविण्यात आले आहे. या ठिकाणी बंजारा समाज संस्कृती व

परंपरांचे दर्शन होणार आहे. येथे दररोज सायंकाळी लेझर, लाईट व म्युझिक शो होणार आहे. नंगारा प्रतिकृतीवर भव्य स्क्रीन लावण्यात आला असून यावर बंजारा संस्कृतीचे दर्शन येथे येणारा प्रत्येक भाविक, पर्यटक घेवू शकेल, असे पालकमंत्री संजय राठोड यांनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोहरादेवी विकास आराखडा व नंगारा म्युझियमसाठी तब्बल ७२५ कोटी रूपयांचा निधी तत्काळ मंजूर केल्याने हा प्रकल्प वेळेत पूर्ण होवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या आंतराष्ट्रीय वास्तुसंग्रहालायचे लोकार्पण होत असल्याने संपूर्ण बंजारा समाज हर्षोल्हासित झाला आहे, असे पालकमंत्री संजय राठोड म्हणाले.

****

वंचित बहुजन आघाडी

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आज मुंबई येथील पत्रकार परिषदेत वंचित बहुजन आघाडीची विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पहिल्या यादीत ११ जणांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा मतदार संघातून सविता मुंडे, वाशिम मतदार संघातून मेघा डोंगरे, अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे इथून निलेश विश्वकर्मा तर भंडारा जिल्ह्यातील साकोली इथून डॉक्टर अविनाश नान्हे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नागपूरच्या दक्षिण -पश्चिम मतदार संघातून विनय भांगे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. वर्तमानात उपमुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडणवीस हे दक्षिण पश्चिम मतदार संघाचे आमदार आहेत. ॲड.आंबेडकर यांनी वंचितचे सहयोगी पक्ष भारत आदिवासी पार्टी आणि गोंडवाना गणतंत्र पार्टी या दोन उमेदवारांची घोषणा केली. सुनील गायकवाड (भारत आदिवासी पार्टी) हे चोपडा मतदार संघातून आणि हरीश उईके (गोंडवाना गणतंत्र पार्टी) हे रामटेकमधून उमेदवार असतील.रावेर मतदारसंघासाठी तृतीयपंथी कार्यकर्त्या शमिभा पाटील यांना उमेदवारी देण्यात आली असून, पारधी समजातील किसन चव्हाण यांना शेवगावमधून उमेदवारी देण्यात आली. विविध वंचित जाती समूहांना प्रतिनिधी देखील पहिल्या यादीत दिले आहे. येत्या काही दिवसांत दुसरी यादी जाहीर करण्यात येईल. तसेच आणखी काही पक्ष लवकरच आमच्या आघाडीत सामील होतील, असेही आंबेडकर यांनी सांगितले. संयुक्त जाहीरनामा आणि वंचित बहुजन आघाडीचा जाहीरनामा निवडणुकीची सूचना येण्याआधीच आम्ही प्रसिद्ध करणार

असल्याचेही ॲड. आंबेडकर यांनी सांगितले. या निवडणुकीत कोणीही पाठिंबा मागितला तर आम्ही देणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

****

प्रधानमंत्री आवास योजना

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत अकोला जिल्ह्यात १० हजार नऊशे एकोणसत्तर घरकुलांचं उद्दिष्ट देण्यात आलं असून गेल्या १५ तारखेपर्यंत यापैकी ५ हजार ५८७ घरकुल लाभार्थ्यांच्या यादीला मंजुरी देण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यातील उर्वरित आणखी ५ हजार ३८२ घरकुल लाभार्थी याद्यांना मंजुरी देण्यासाठी जिल्हा परिषद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि जिल्ह्यातील सातही पंचायत समित्या आदी संबंधित यंत्रणांची कार्यवाही सुरू आहे. ही प्रक्रिया ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण करणं आवश्यक आहे. केंद्र शासनामार्फत राबवण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेत ग्रामीण भागात घरकुल मंजूर करण्यात आलेल्या पात्र लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी एक लाख वीस हजार रुपयांचं अनुदान दिलं जातं.

****

हवामान

विदर्भातील नागपूर, भंडारा, वर्धा आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने, वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट, नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागातर्फे जारी करण्यात आला आहे. येत्या **23** तारखेला अर्थात सोमवारी, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

******